मुख्य कार्यालय, विरार
विरार (प),
ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./ /
दि.०१/१०/२०२६

समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग

सेवा संकल्प अभियान अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना सहाय्यक उपकरणांचे मोफत वाटप करणे कामी तपासणी शिबिराचे आयोजन

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दि.१७ सप्टेंबर २०२६ ते दि.१७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत "सेवा संकल्प अभियान" राबविण्यात येत आहे. सेवा संकल्प अभियान अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी सहाय्यक उपकरणांचे मोफत वाटप करणे कामी तपासणी शिबिराचे आयोजन महानाग्रपलीकेमार्फत करण्यात आले आहे. प्रधानमंत्री दिव्यशा केंद्र मार्फत ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी सहाय्यक उपकरणांचे मोफत वाटप करण्यात येते. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या *प्रभाग समिती 'बी', 'डी' व 'एफ' या प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील *६० वर्षावरील ज्येष्ठ नागरीकांसाठी सहाय्यक उपकरणे मोफत वाटप* करण्याकामी *तपासणी शिबीराचे* आयोजन *वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती 'डी' कार्यालय, वेदांत टॉवर, तळमजला, दामोदर हॉल समोर, पाचअंबा, तुळींज, नालासोपारा (पूर्व)* येथे शुक्रवार *दि.०२/१०/२०२६* रोजी *सकाळी १०.०० ते दुपारी ३.००* वाजता करण्यात आले आहे.

सदर तपासणी शिबिरामध्ये पात्र लाभार्थ्यांनी १) पिवळे किंवा केशरी रेशनकार्डाची रंगीत स्वसाक्षांकित प्रत. २)कुटुंबाचे उत्पन्न दरमहा रु.१५,०००/- किंवा वार्षिक रु.१,८०,०००/- च्या आत असल्याबाबतचा दाखला. (यामध्ये मा.नगरसेवक-नगरसेविका यांचा दाखला किंवा रेशनकार्डावर नमूद केलेले उत्पन्न किंवा स्वयंघोषणापत्र यापैकी कोणताही एक दाखला ग्राह्य राहील.) ३) ज्येष्ठ नागरिक असलेबाबतचा वयाचा पुरावा म्हणून आधार कार्डाची स्वसाक्षांकित प्रत. ही कागदपत्रे तसेच *मूळ रेशन कार्ड व मूळ आधार कार्ड* स्वतः सोबत आणावेत.

तरी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'बी' विरार पूर्व, 'डी' आचोळे, नालासोपारा (पूर्व) व 'एफ' धानीव/पेल्हार या प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील सर्व पात्र ज्येष्ठ नागरिकांनी या तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.